# जिल्हा निर्यात प्रचालन समिती बैठक दिनांक 13-2-2023 रोजी चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समितीची बैठक दिनांक 13 2 2023 रोजी दुपारी सकाळी 11 वाजता मा डॉ.सचिन ओम्बासे (भा.प्र.से) जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समिती सभागृह उस्मानाबाद येथे संपन्न झाली.सर्वप्रथम महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत केले.मा.अध्यक्षांच्या परवानगीने खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

जी.आय. मानांकनाबाबत सरमकुंडी खवा उद्योग,कवड्याची माळ तुळजापूर यांचे प्रस्ताव जी.आय. मानांक्नासाठी मुंबई कार्यालयात प्रलंबित आहेत.यावर दिनांक 9 व 10 मार्च रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली असून त्यावर चर्चा होणार असले बाबत महाव्यवस्थापक यांनी सांगितले.यावर सदरील बैठकीस हजर राहणेसाठी संबंधितांना कळविण्यात यावे असे मा.अध्यक्षांनी सुचित केले.

एक जिल्हा एक उत्पादन अंतर्गत उस्मानाबाद जिल्ह्यासाठी औद्योगिक उत्पादन साखर असून कृषीवर आधारित उत्पादन सर्व प्रकारच्या डाळी आहेत असे महाव्यवस्थापक यांनी सांगितले यावर मा.अध्यक्षांनी साखर ऐवजी खवा हे औद्योगिक उत्पादन म्हणून निवडण्यात यावे असे सूचित केले.

बालाजी अमाईन्स तामलवाडी यांचे निर्यात प्रतिनिधी श्री.अमित महंत यांनी खाजगी कन्सल्टन्सी यांना योग्य तो मोबदला देऊन सेवा मिळावी याबाबत विनंती केली.तसेच निर्यातीच्या वस्तू बाबत माहिती व खरेदीदाराची माहिती नियमित पोर्टलवरून उपलब्ध व्हावी अशी विनंती केली.यावर योग्य त्या कार्यवाहीबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले.

जिल्ह्यातील प्रमुख उत्पादनांना देशांतर्गत बाजारपेठ उपलब्ध व्हावी यासाठी प्रयत्न करण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देशित केले.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने महाव्यवस्थापक यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव जिल्हा निर्यात प्रचालन

**मा.जिल्हाधिकारी**
**तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन**

महाराष्ट्र शासन
उद्योग संचालनालय
जिल्हा उद्‌योग केंद्र, उस्मानाबाद
जिल्हा कारागृहासमोर, उस्मानाबाद. पिन-413501

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी: (02472) 295221 E mail -didic.osmanabad@maharashtra.gov.in

जा.क्र.जिउकेंउ/DEPC/2023-24/ दिनांक:23/05/2023

**जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दि.18/05/2023 चे इतिवृत्त**

जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दिनांक 18/05/2023 रोजी सकाळी 10.30 वाजता मा.डॉ.सचिन ओम्बासे (भा.प्र.से) जिल्हाधिकारी,उस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद येथे संपन्न झाली.सदर बैठकीसाठी सर्व निर्यात प्रचालन समिती सदस्य तसेच जिल्ह्यातील निर्यातदार यांना आमंत्रित करण्यात आले होते.

सभेच्या सुरवातीस श्री.अमोल बळे महाव्यवस्थापक जिल्हा उद्‌योग केंद्र,उस्मानाबाद यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.जिल्हा निर्यात प्रोत्साहन आराखड्यामध्ये नमूद केलेल्या मुद्‌दयाप्रमाणे जिल्ह्याची सध्याची निर्यात स्थिती,संभाव्य ODOP व GI उत्पादने,निर्यातीसाठी विद्‌यमान व प्रस्तावित पायाभूत सुविधा,एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहन धोरण,ODOP व GI उत्पादनासाठी ब्रँडिंग,पॅकिंग,डिझायनिंग मार्केटिंगसाठी प्राथमिकरित्या निवडल्या गेलेल्या संस्था,तसेच जिल्ह्यातील निर्यात दुपटीने वाढविण्याच्या दृष्टिने अल्पकालीन,मध्यमकालीन व दीर्घकालीन निर्यात प्रोत्साहन धोरण इत्यादी बाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.जिल्ह्यातून निर्यात करता येतील अशा विविध संभाव्य उत्पादनाबाबत माहिती देऊन संभाव्य निर्यातदार तसेच संभाव्य निर्यात देश याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

जिल्ह्यातील ODOP उत्पादनाचे ब्रँडिंग,पॅकिंग,डिझायनिंग,मार्केटिंगसाठी जिल्ह्यातील R&D संस्था,महाविद्‌यालये यांच्याशी MOU करण्याबाबत तसेच जिल्ह्यातील निर्यातदारासाठी जिल्हा निर्यात प्रचालन समिती आणि DGFT यांच्याशी समन्वय साधून त्यांच्यामार्फत प्रशिक्षण कार्यक्रम कार्यशाळा, निर्यात जागृती मेळावे,खरेदीदार विक्रेते यांचे मेळावे इत्यादी आयोजित करण्याबाबत चर्चा करण्यात आली.जिल्ह्याची निर्यात क्षमता वाढविण्यासाठी क्वालिटी सर्टिफिकेशन लॅब्स तसेच जिल्हा उद्‌योग केंद्रामध्ये निर्यात प्रचालन कक्ष स्थापन करण्याबाबत चर्चा झाली.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून मा,अध्यक्षांच्या परवानगीने महाव्यवस्थापक यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक
तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

मा. जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

# जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दि.29/01/2024 चे इतिवृत्त

जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभा दिनांक 29/01/2024 रोजी ~~दुपारी~~ सकाळी 10:00 वाजता मा. डॉ.सचिन ओम्बासे (भा.प्र.से) जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय,धाराशिव येथे संपन्न झाली. सदर बैठकीसाठी सर्व निर्यात प्रचालन समिती सदस्य तसेच जिल्ह्यातील निर्यातदार यांना आमंत्रित करण्यात आले होते.

सभेच्या सुरवातीस श्री.अमोल बळे महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र,धाराशिव यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. जिल्हा निर्यात प्रोत्साहन आराखड्यामध्ये नमूद केलेल्या मुद्दयाप्रमाणे जिल्ह्याची सध्याची निर्यात स्थिती, संभाव्य ODOP व GI उत्पादने, निर्यातीसाठी विद्यमान व प्रस्तावित पायाभूत सुविधा, एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहन धोरण, ODOP व GI उत्पादनासाठी ब्रँडिंग,पॅकिंग,डिझायनिंग मार्केटिंगसाठी प्राथमिकरित्या निवडल्या गेलेल्या संस्था इत्यादी बाबत चर्चा करण्यात आली. जिल्ह्याच्या निर्यातीमध्ये वाढ होण्यासाठी निर्यातदारांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत DGFT पुणे यांच्या सहकार्याने दिनांक 07/12/2023 रोजी IGNITE Maharashtra अंतर्गत 1 दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदरील कार्यशाळेस उद्योजक, नवोद्योजक, शेतकरी उत्पादक गट, स्वयंसहयता बचत गटामधील प्रतिनिधी हजर होते.

तसेच दिनांक 29/12/2023 रोजी Cornell Maha-60 अंतर्गत 1 दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदरील कार्यशाळेस उद्योजक, नवोद्योजक, तृतीय व अंतिम वर्षातील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी व माजी विद्यार्थी हजर होते.

धाराशिव जिल्ह्यातील सरमकुडी येथील खवा व श्री जंगदबादेवी तुळजापुरची कवड्याची माळ यांचे भौगोलीक मानांकन (G.I.) प्राप्त झालेबाबत माहीती सभागृहाला देण्यात आली.

चालू आर्थिक वर्षात शासनाच्या काही काळ साखर निर्यात बंदी धोरणामुळे धाराशिव जिल्हात साखरेची निर्यात कमी झालेबाबतची माहीती सभागृहाला देण्यात आली. जिल्ह्यामधून निर्यातकक्षम वस्तू,डाळी, इत्यादींच्या निर्यातीवर भर देऊन जिल्ह्याची निर्यात वाढवण्यास मदत करावी. यामध्ये काही अडचणी आल्यास जिल्हा उद्योग केंद्राच्या निर्यात प्रचालन कक्षाशी संपर्क साधावा असे आवाहन महाव्यवस्थापक यांनी केले.

महाराष्ट्र उद्योग व्यापार आणि गुंतवणुक सुविधा अधिनियम 2023 बाबत माहीती देण्यात आली व त्याअंतर्गत जिल्हास्तरीय विविध 15 विभागामार्फत देण्यात येणा-या सेवाची माहीत सभागृहास देण्यात आली. यावर मा. अध्यक्ष यांनी सर्व औद्योगिक संघटनांना सदर सेवेचा लाभ घेणेबाबत आवाहन केले.

शेवटी उपस्थितांचे आभार मानून मा,अध्यक्षांच्या परवानगीने महाव्यवस्थापक यांनी बैठक संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती,धाराशिव

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती,धाराशिव